विषय :- कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे कार्यसूचीबाबत

परिपत्रक 301

असे निदर्शनास आले आहे की, विभागीय कार्यालयातील कार्यालय प्रमुख हे स्वत:च्या अखत्यारीत अधिक्षक, निरिक्षक, लेखापाल यांच्या कार्यसूचीमध्ये बदल करतात. अधिक्षक, लेखापाल, शिरस्तेदार व इतर कर्मचाऱ्यंाची कार्यसूची धर्मादाय आयुक्त यांनी यापूर्वी निश्चित केलेली आहे. सदर कार्यसूचीमध्ये बदल करण्याचे अधिकार फक्त विभाग प्रमुखांनाच आहेत असे असताना विभाग प्रमुखांच्या पूर्व परवानगीशिवाय किंवा मान्यतेशिवाय विभागीय अधिकारी व कार्यालय प्रमुख यांनी कर्मचाऱ्यांचे कार्यसूचीमध्ये बदल करु नयेत याची नोंद घ्यावी.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई